CMYK

अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय >> पान 2

सीएम एकनाथ शिंदे यांनी चॅलेंज देऊनही पराभूत! >> पान 3

मेहकरात आज भव्य मोफत रोगनिदान व रक्तदान शिबीर >> पान 4

**सुविचार**

मेहनतीशिवाय कोणतेही स्वप्न पूर्ण होत नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 105 ■ सोमवार, दि. 25 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





पुष्पा २ मध्ये अल्लू अर्जुनसोबत Kissik हा आयटम नंबर करणारी कोण आहे श्रीलीला?

आतील पान

# शपथविधीचं ठरलं! शिंदेंच्या मोठ्या हालचाली

## आमदारांसाठी विशेष विमानं; 'वर्षा'वर काय घडतंय? जवळच्या नेत्याकडून महत्त्वाची माहिती

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडी व महायुती यांच्यात थेट झालेल्या लढाईत कोण बाजी मारणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. अखेर, शनिवारी (२३ नोव्हेंबर) निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून महायुतीला बहुमत मिळालं आहे. महायुतीला २८८ पैकी २३६ जागांवर विजय मिळाला आहे. तर, महाविकास आघाडीला केवळ ४९ जागा जिंकता आल्या. महायुतीमध्ये भाजपाला १३२, शिवसेनेला (शिंदे) ५७, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला (अजित पवार) ४१ जागा मिळाल्या आहेत. तर, महाविकास आघाडीत शिवसेनेला (ठाकरे) २०, काँग्रेसला १६ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने १० जागा जिंकल्या आहेत. दरम्यान, राज्यातील जनतेने स्पष्ट बहुमत दिल्यानंतर आता महायुतीकडून सरकार स्थापनेच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.**

विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरपर्यंतच आहे. तत्पूर्वी नवं सरकार स्थापन करणं अपेक्षित आहे. २६ नोव्हेंबरपर्यंत नवं सरकार स्थापन झालं नाही तर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते. त्यामुळे महायुती २६ नोव्हेंबरपर्यंत सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करेल अशी शक्यता वर्तवली जात होती. अखेर या बातम्यांवर आता शिक्कामोर्तब झालं आहे. शिवसेना आमदार बालाजी कल्याणकर यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

भारतीय जनता पार्टी राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला असून राज्यपाल या पक्षाला सत्तास्थापनेसाठी आमंत्रित करू शकतात. दरम्यान, अनेक वृत्तवाहिन्यांनी सूत्रांच्या हवाल्याने बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत की मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर नव्या सरकारचा शपथविधी होईल.

बालाजी कल्याणकर यांनी काय सांगितलं?

त्यानंतर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदारांची मुंबईत बैठक बोलावली आहे. राज्याच्या वेगवेगळ्या भागातील आमदार तातडीने मुंबईत पोहोचावेत यासाठी त्यांनी आमदारांना आणण्यासाठी विशेष विमानं पाठवल्याचं कल्याणकर यांनी सांगितलं. शिवसेनेचे नांदेडमधील तीन आमदार मुंबईकडे रवाना झाले आहेत. आज मुंबईत या आमदारांची बैठक होणार आहे. दरम्यान, बालाजी कल्याणकर यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, ''आम्ही शिवसेनेचे नांदेडमधील तिन्ही आमदार मुंबईला जात आहोत''.

बालाजी कल्याणकर म्हणाले, ''हदगावचे आमदार बाबूराव कदम-कोहळीकर, नांदेड दक्षिणचे आमदार आनंद तिडके आणि मी तात्काळ मुंबईसाठी रवाना होत आहे. सोमवारी नव्या सरकारचा शपथविधी होणार आहे. तत्पूर्वी आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेच्या सर्व आमदारांना मार्गदर्शन करणार आहेत''.

## राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच विरोधी पक्षनेत्याविना चालणार सभागृह?

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचं चित्र पूर्णपणे स्पष्ट झालंय. या निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी जुळवाजुळव झाली. भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीसमोर महाविकास आघाडीचा दारुण पराभव झालाय. विधानसभा निवडणुकीच्या निकालापूर्वी महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांनी मुख्यमंत्रिपदाचं स्वप्न उराशी बाळगलं होतं. पण निकालानंतर महाविकास आघाडीला विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद देखील नशिबी आलेलं नाही. विशेष म्हणजे राज्याच्या इतिहासात अशी स्थिती पहिल्यांदाच निर्माण झाल्याचं बोललं जातंय.

महाविकास आघाडीतील घटक पक्ष काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) यापैकी कोणत्याही पक्षाला २० पेक्षा जास्त जागा निवडून आणता आलेल्या नाहीत. विरोधी पक्षनेतेपदासाठी लोकसभा तसंच विधानसभेत एकूण सदस्य संख्येच्या प्रमाणात ठराविक संख्याबळाची आवश्यकता असते. त्यामुळं लोकसभा आणि विधानसभा नियमावलीनुसार एखाद्या पक्षाला विरोधी पक्षनेतेपद तेव्हाच मिळतं, जेव्हा राज्यातील विधानसभेच्या एकूण जागांपैकी १० टक्के जागा असतात. सध्या महाविकास आघाडीतील घटक पक्षांपैकी कोणत्याही पक्षाला किमान दहा टक्के जागांची मर्यादादेखील ओलांडता आली नाही. महाविकास आघाडीसाठी विरोधी पक्षनेते पदाचा मार्ग देखील बंद झालाय.

महाराष्ट्र विधानसभेत एकूण २८८ जागा आहेत. त्यामुळं कोणत्याही पक्षाकडं विरोधी पक्षनेतेपदासाठी किमान २९ आमदार असले पाहिजेत. पण, महाविकास आघाडीत कोणत्याही पक्षाचे २९ आमदार विजयी झालेले नाहीत. काँग्रेसपासून शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पर्यंत कोणत्याही पक्षाला २० पेक्षा जास्त जागा जिंकता आल्या नाहीत. महाविकास आघाडीच्या तिन्ही प्रमुख पक्षांच्या आणि अन्य लहान घटक पक्षांच्या मिळून ४६ जागा मिळाल्या. पण एकाही पक्षाला २९ जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळं महाराष्ट्रात महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेता पददेखील नशिबी नसल्याचं चित्र आहे.

## ठळक...

### भाजपच्या विजयी उमेदवारांचे माजी खा. नवनीत राणा यांनी केले औक्षण



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : नुकताच महाराष्ट्र विधानसभा २०२४ चा निकाल जाहीर झाला. अमरावती जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदार संघामध्ये ७ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये भाजपचे पाच तर एक राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी तर एक राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार विजयी झाला आहे. यामध्ये बच्चू कडू यांचा पराभव करणारे प्रवीण तायडे, यशोमती ठाकूर यांचा पराभव करणारे राजेश वानखडे तर राजकुमार पटेल यांचा पराभव करणारे केवलराम काळे या तीनही विजयी उमेदवारांना माजी खासदार नवनीत राणा यांनी त्यांच्या गंगा सावित्री घरी औक्षण करून शुभेच्छा दिल्या.

### लाडक्या बहिणींनी लाडक्या भावाला विजयाची भेट दिली : धैर्यशील माने

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी** : लाडक्या बहिणींनी लाडक्या भावाला विजयाची भेट दिली, कोल्हापूर जिल्ह्याने १०० टक्के स्ट्राईक रेट दिला आहे.अशी प्रतिक्रिया खा. धैर्यशील माने यांनी दिली. ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी ठाणे येथे आले असता माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी ते पुढे म्हणाले की, कोल्हापुरच्या मातीतून महायुतीचे रणशिंग फुकले गेले होते, महायुतीची पहिली सभा कोल्हापुरला झाली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अडीच वर्षे केलेल्या विकासावर आज जनतेने शिक्कामोर्तब केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी कोल्हापुरातील १० ही आमदार आलो आहेत. कोल्हापूर जिल्ह्याने १०० टक्के स्ट्राईक रेट दिला आहे. शिवसैनिक व महाराष्ट्रातील आम जनतेची इच्छा आहे की परत एकदा एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री व्हावेत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढली गेली आणि एवढा मोठा विजय मिळाला आहे. हे यश म्हणजे महाराष्ट्राच्या लाडक्या बहिणींनी त्यांच्या लाडक्या भावाला दिलेली भेट आहे.अशी प्रतिक्रिया खा. धैर्यशील माने यांनी दिली.

### एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे आमची इच्छा; संजय शिरसाट यांनी व्यक्त केले मत



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : जेव्हा आपण विजयी होतो तेव्हा पक्षाच्या नेत्याला आपण भेटले पाहिजे कारण त्यांच्या शुभेच्छा आपल्या पाठिशी असतात, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संध्याकाळी शिवसेनेच्या सर्व आमदारांची बैठक घेणार असून त्या बैठकीत गटनेत्याचा ठराव घेतला जाईल, अशी माहिती शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी ठाणे येथे बोलताना दिली. यावेळी ते पुढे म्हणाले की,महायुतीतील तिन्ही पक्षाचे नेते एकत्र बसल्यानंतर वरिष्ठ पातळीवर चर्चा होईल आणि मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण ते ठरेल, कदाचित उद्या शपथ विधी होईल, असा अंदाजही त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रत्येक पक्षाच्या आमदाराला आपल्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री व्हावे असे वाटते, एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत ही आमची इच्छा आहे. बैठकीत गटनेत्यांचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी दिली.

## जमिनीवरची परिस्थिती आणि लागलेले निकाल यात शंभर टक्क्याचे अंतर

### जितेंद्र आव्हाड यांची निकालावर प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात लागलेला निकाल हा अनपेक्षित आहे.या निकालाबाबत महाराष्ट्रात सगळेच बोलताहेत,आम्हीच नाही. महाराष्ट्रातील जमिनीवरची परिस्थिती आणि लागलेले निकाल यात शंभर टक्के अंतर आहे, असे महाराष्ट्रातील जनताच म्हणते, अशी प्रतिक्रिया आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली. ते मुंबई येथे माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.



यावेळी ते पुढे म्हणाले की, लोकसंयश आहे ना आम्ही अजून ईव्हीएम वरती काहीच बोललेलो नाही, आम्ही कशावरच काही बोललो नाही, ज्या आमच्या सभा झाल्या त्यात लाखोलाखो लोक आली होती. तिथे आम्हाला स्पष्ट दिसत होते. मोदी लाट आहे, मी महाराष्ट्राचा आतापर्यंतचा इतिहास वाचून दाखवतो असं कधी संयुक्त महाराष्ट्राची निवडणूक झाली चळवळीची तेव्हा कधी असं झाले नाही. १९७७-८० साली असं कधी झाले नाही. ८९ सालीही नाही, असा निकाल महाराष्ट्राच्या इतिहासात कधी लागला नाही. विरोधी पक्ष नेते ताकदीने लढले, सत्ताधारी पण ताकदीने लढले. पण विरोधी पक्षाला समान उमेदवार मिळाले, ही आश्चर्याची बाब आहे. स्थानिक निवडणुका आता लगेच घेतील, १९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर आज पर्यंतच्या निवडणुकीमध्ये सत्ताधाऱ्यांनी अशी काही निवडणूक जिंकली नाही, की विरोधीपक्ष फार धुळीस मिळाला आहे. त्यावेळी काँग्रेस सत्ताधारी होती पण त्यांनी विरोधी पक्षासोबत अशी कधी निवडणूक जिंकली नाही, शरद पवार लोकांच ऐकूण घेत आहे त्यांनंतर ते बोलतील, अशी प्रतिक्रिया शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केली.

## लोकप्रियता लक्षात घेवून एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री पद मिळेल; अब्दुल सत्तार यांची अपेक्षा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षाचा कार्यकाळ शेतकरी, मोलमजूर, गोरगरीब प्रत्येक माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. ही जी निवडणूक झाली त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होतील अशी आशा आहे.अशी अपेक्षा शिवसेना शिंदे गटाचे नवनिर्वाचित आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केली. यावेळी सत्तार म्हणाले की, भाजप देशात,राज्यात आमचे मोठे भाऊ आहेत. त्यांनी छोट्या भावानी चांगली कामगिरी केली. त्यांची लोकप्रियता लक्षात घेवून जनतेच्या मनातील मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे याचं सर्वे मधील देखील त्याचं नाव आहे. मला पाडण्यासाठी ठाकरे हे भारतीय जनता पार्टीकडे भीक मागत होते. त्यांनी आत्मपरिक्षण करावे,परंतु, आत्मपरीक्षण करण्यासाठी त्यांच्याकडे आत्मादेखील राहिला नाही, असा टोला त्यांना लगावला.तर, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे मराठवाड्याला नक्की झुकते माफ देतील, सर्वसामान्य जनता कार्यकर्ते यांचा इच्छा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच व्हावेत,अशी अपेक्षा शिवसेना



शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.

## राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी अजित पवार यांची निवड!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यभरात सुरु असणाऱ्या विधानसभा निवडणुकीचा निकाल काल जाहीर झाला. यामध्ये घवघवीत यशाने महायुतीचे सरकार विजयी झाले आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील सर्व राजकीय उमेदवारांनी भरघोस मतांनी यश मिळवले आहे. अशातच उद्या नव्या सरकारचा शपथविधी देखील होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, आज मुंबईत राष्ट्रवादीच्या आमदारांची पार पडलेल्या बैठकीमध्ये राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी अजित पवारांची निवड झाली आहे. दरम्यान, मविआचा पराभव करत महायुतीला या निवडणुकीत २२० पेक्षा जास्त जागांवर यश मिळाले आहे. या निवडणुकीत अजित पवार गटाला देखील चांगलं यश मिळाले आहे. अजित पवार गटाने या निवडणुकीत केवळ ५३ ठिकाणी उमेदवार दिले होते. त्यापैकी तब्बल ४१ जागांवर अजित पवार गटाच्या उमेदवारांचा विजय झाला आहे.

# सत्ता आली म्हणून दादागिरी करायची हे मराठ्यांपुढे चालणार नाही

## मनोज जरांगे पाटील यांचा सत्ताधाऱ्यांना इशारा

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : मराठा आरक्षण लवकर द्यायचे, बेईमानी करायची नाही, मी आणि मराठा समाज मैदानातच नव्हतो. आम्ही नाही तर कशाला वळवळ करतो, सरकारला जाहीर पणाने सांगतो मराठा आरक्षण द्यायचे नाहीतर पुन्हा छाताडावर बसणार असून सामुहिक आमरण उपोषणाला बसणार आहोत, अशी रोखठोक भूमिका घेत मनोज जरांगे पाटील यांनी नवीन सरकारला शुभेच्छा दिल्या. यावेळी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सत्तेत आलेल्या सरकारला इशारा देताना म्हणाले की, आरक्षणात खोडा घातला तर तुम्हाला गुडघ्यावरच टेकवणार आहे. एका जातीवर निवडून येणे शक्य नव्हतो, म्हणून आम्ही बाजुला झालो. कुणाचाही सत्ता आली तरी आम्हाला संघर्ष करावाच लागणार आहे. पण हुरळून जायचं नाही आणि मराठ्यांना छेडायचे काम करायचे नाही,असा इशारा देत सत्तेत आले म्हणून दादागिरी करायची हे मराठ्यांपुढे चालणार नाही, असा दम मनोज जरांगे पाटील यांनी दिला. यावेळी ते म्हणाले की, नसता भोग भोगावे लागतील, चांगले लोकं निवडा हे मराठ्यांना सांगितलं होते, मी कुणाच्याही दावणीला मराठा बांधला नव्हता, मराठ्यांशिवाय राज्यात कुणाचीही सत्ता येवू शकत नाही, आता मराठ्यांनी दिले तर मराठ्यांना आरक्षण द्या, मराठ्यांना मणगट लावायचे काम करायचे नाही, मराठ्यांच्या नादी लागणे सोपं आहे का ?असा प्रश्न त्यांनी केला आहे. मीच मराठा समाज आझाद करून सोडला आहे. मराठ्यांना जे योग्य वाटले ते त्यांनी केले. कुणाचे सरकार आले याचे,आम्हाला काही देणं घेणं नाही. मैदानात असतो तर धुरळा उडाला असता, कशाचा अभ्यास करता ओ तुम्ही जरांगे फॅक्टरचा अभ्यास करायला हयात जाईल, आमचा कोणत्याच उमेदवारावर राग नाही. या राज्यात मराठेच बाप ठरले आहेत. मराठ्यांच्या मताशीवाय या राज्यात कुणीच सत्तेत येवू शकत नाही, बघा आता मराठ्यांची कशी लाट येते. मैदानात आम्ही असतो तर एक शिक्का काम केले असते. आता आंदोलन पुकारु द्या, सगळे एका बाजुला दिसतील, आम्ही एकच आहोत. मी निवडून येणारा आणि पडणाऱ्यांचेही अभिनंदन करतो. आंदोलन आणि जातीची आस्मिता हा भाग वेगळा आहे. मराठ्यांच्या नादी लागायचं नाही, मराठ्यांच्या फॅक्टरची भिती होती म्हणून मराठ्यांना तिकीट दिलेत. सत्तेत येणाऱ्यांनी हुरळून जाऊ नये, आणि मराठ्यांशी पंगाही घेऊ नये, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला.



CMYK

## महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज पुण्यतिथी. आजच्याच दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए – एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्री पदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. यशवंतराव चव्हाण यांना भावपूर्ण आदरांजली.

# अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय



अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय या तीन शब्दात पंधराव्या विधानसभेच्या निकालाचे वर्णन करावे लागेल. अभूतपूर्व म्हणजे या पूर्वी कधीही घडले नाही असे. हो हा निकाल अभूतपूर्व असाच आहे कारण यापूर्वी असा निकाल महाराष्ट्राने कधीही पाहिला नव्हता. २०१४ च्या मोदी लाटेतही जे घडले नव्हते ते आता घडले. महायुतीने तब्बल दोनशे छत्तीस जागा जिंकत महाविकास आघाडीचा सुफडा साफ केला. महाराष्ट्रात महायुतीची लाट नव्हे तर त्सुनामी आली. या त्सुनामीत महाविकास आघाडीचे अनेक गड उध्वस्त झाले. महाविकास आघाडीच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला.

ही त्सुनामी इतकी जबरदस्त होती की पाच महिन्यांपूर्वी जी महाविकास आघाडी अजिंक्य वाटत होती तिला अर्धशतक देखील गाठता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभेला विरोधीपक्ष नेता देखील मिळणार नाही अशी अवस्था झाली. हे खरोखरच अभूतपूर्व असेच आहे. अनाकलनीय या अर्थाने की असा निकाल लागेल असा अंदाज कोणालाच आला नव्हता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील राजकीय धुरिणांना असा निकाल लागेल असे वाटले नव्हते. खुद्द भाजप आणि महायुतीच्या नेत्यांना देखील हा इतका विराट विजय मिळेल असे वाटले नसेल. भल्या भल्यांना विचार आणि अभ्यास करायला लावणारा असा हा निकाल आहे. महायुतीला या निवडणुकीत महाविकास आघाडीपेक्षा थोड्याफार जागा अधिक मिळतील असा अंदाज होता. महायुती कसाबसा सत्तेचा सोपान चढेल असा अंदाज होता निवडणूक पूर्व चाचणीत ही तेच दाखवण्यात आले होते मात्र प्रत्यक्षात त्याहूनही खूप वेगळे घडले.

अविश्वसनीय या अर्थाने की या निकालावर विश्वास ठेवणे अनेकांना अजूनही कठीण जात आहे. काहीजण या निकालावर अजूनही विश्वास ठेवायला तयार नाही कारण अवघ्या पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे वेगळे चित्र पाहायला मिळाले होते. महाविकास आघाडीने आश्चर्यजनक कामगिरी करत लोकसभेच्या ३० जागा जिंकत महायुतीला नामोहरण केले होते. अवघ्या पाच महिन्यात अशी काय जादूची कांडी फिरली की ज्याने इतका मोठा उलटफेर केला ? लोकसभेप्रमाणेच विधान सभेतही महाविकास आघाडीची सरशी होईल असा कयास काहीजण लावत होते त्यामुळेच या निकालावर त्यांचा विश्र्वास बसत नाही अर्थात कोणाचा विश्र्वास बसो अगर न बसो जनतेने दिलेला हा निकाल राजकीय पक्षांसह सगळ्यांना स्वीकारावाच लागणार आहे. हा जनतेच्या न्यायालयाने दिलेला निकाल आहे तो स्वीकारूनच विरोधी पक्षांनी या निकालाचे आत्मचिंतन करायला हवे. या निकालाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटी नंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणीवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीने सामूहिक प्रयत्न केला त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेहमीप्रमाणे साथ लाभली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रचाराचे अतिशय सूक्ष्म व काटेकोर नियोजन केले. याउलट माहविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. जागा वाटप असोत की प्रचार सभा महाविकास आघाडीची एकजूट कोठेच दिसली नाही. महाविकास आघाडीचे नेते सत्ता आपल्यालाच मिळाली या थाटात एकमेकांशी भांडू लागले. मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू झाली. महाविकास आघाडीतील बाष्कळ नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली.

लोकसभा निवडणुकीत झालेली पिछेहाटी नंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजनेअंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. ज्या वेळी ही योजना आली त्यावेळी विरोधी पक्षांनी या योजनेवर टीका केली ही टीका कदाचित महिला मतदारांना रुचली नसावी. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश.

या निकालाने काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तिन्ही पक्षांना मतदारांनी नाकारून भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवला आहे त्यामुळे या तिन्ही पक्षांना आता पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागेल. अर्थात एका पराभवाने कोणताही पक्ष संपत नसतो झालेल्या चुका दुरुस्त करून या पक्षाने २०२९ चे लक्ष समोर ठेवून पक्षाची बांधणी करावी लागेल. पक्षातील जुन्या बोल बच्चन नेत्यांना बाजूला सारून नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करावे लागतील. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून या पक्षांनी तयारी सुरू करावी तर महायुतीने जनतेने दिलेल्या अभूतपूर्व यशाचा आदर राखत जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करून महाराष्ट्राला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## शरीरातील या समस्या आहेत फुफ्फुसाच्या संसर्गाची लक्षणे, अशी घ्या काळजी

आता देशात कोरोनाची व्याप्ती कमी होताना दिसत आहे. मात्र, यापूर्वी हजारो लोक पुन्हा या विषाणूच्या विळख्यात आले आहेत. या वेळी कोविडची लक्षणे पूर्वीप्रमाणेच सौम्य राहिली, परंतु गंभीर आजार असलेल्या रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागले, परंतु रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर काही लोकांना श्वसनाचा त्रास होत आहे, ज्याचे कारण थेट फुफ्फुसाच्या कम कुवतपणामुळे आहे. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, काही प्रकरणांम ध्ये कोविडची सौम्य लक्षणे दिल्यानंतरही समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

यामध्ये श्वसनमार्गाशी संबंधित समस्या अधिक दिसून येतात. कोविडमधून बरे झाल्यानंतरही तुम्हाला श्वसनाचा त्रास होत असेल, तर तुम्ही डॉक्टरांशी संपर्क साधावा. हे फुफ्फुसातील संसर्गाचे लक्षण आहे. या बाबीकडे दुर्लक्ष केल्यास फुफ्फुसातील समस्या वाढू शकते.

पल्मोनोलॉजिस्ट डॉ भगवान मंत्री स्पष्ट करतात की कोविड नंतर श्वासोच्छवासाची समस्या दिसून येते. अशी समस्या उद्भवल्यास पल्मोनरी फंक्शन टेस्ट करता येते. या चाचणीच्या मदतीने, फ ुफ्फुसात किंवा श्वसनमार्गामध्ये कोणताही संसर्ग शोधला जाऊ शकतो. कोविड दरम्यान काही रुग्णांमध्ये न्यूमोनियाच्या तक्रारी देखील दिसून येतात, ज्याचा प्रभाव बरे होईपर्यंत टिकतो. अशा परिस्थितीत, आपल्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे. जर तुम्ही दमा, सीओपीडी किंवा ब्राँकायटिसचे रुग्ण असाल, तर फुफ्फुसांच्या आरोग्याची काळजी घेणे फार महत्वाचे आहे.

गेल्या दोन दिवसांपासून देशात कोविडचे रुग्ण कमी होत आहेत. गेल्या २४ तासांत ७ हजारांहून कमी केसेसची नोंद झाली आहे. तीन दिवसांपूर्वीपर्यंत १० हजारांहून अधिक केसेस येत होत्या, या दृष्टिकोनातून कोविडचा आलेख आता घसरत आहे. नवीन रुग्णांसोबतच सक्रिय रुग्णांची संख्याही कमी होत आहे. सक्रिय प्रकरणांचा आकडा ६५ हजारांवरून ६३,३८० वर आला आहे. तथापि, अनेक राज्यांमध्ये कोविडच्या नवीन प्रकरणांमध्ये फारशी घट झालेली नाही. केरळम ध्ये अजूनही १०,००० हून अधिक सक्रिय प्रकरणे आहेत, परंतु राज्यांचा सकारात्मकता दर खाली येऊ लागला आहे. दिल्लीतील संसर्गाचे प्रमाणही आता कमी होत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की हे शिखर पार झाल्याचे लक्षण आहे, जरी काही दिवस नवीन प्रकरणांवर लक्ष ठेवावे लागेल.

## रिकाम्या पोटी मधासोबत 'खा' एक पदार्थ, नसांमध्ये चिकटलेला घाणेरडा कोलेस्ट्रॉल पडेल बाहेर

आजकाल लोकांना खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे अनेक गंभीर आजारांना साम ोरे जावे लागत आहे. या आजारांमध्ये उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या देखील समाविष्ट आहे. कोलेस्ट्रॉल हा मेणासारखा पदार्थ शरीरात असतो, जो शरीराच्या चांगल्या कार्यासाठी आवश्यक असतो. शरीरात दोन प्रकारचे कोलेस्ट्रॉल असते, चांगले कोलेस्ट्रॉल (कथ) आणि वाईट कोलेस्ट्रॉल (थथ). शरीर निरोगी ठेवण्यासाठी चांगले कोलेस्ट्रॉल आवश्यक आहे. परंतु जेव्हा शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढते तेव्हा ते रक्तवाहिन्यांमध्ये जमा होते आणि अडथळा निर्माण होऊ शकतो. त्याम ुळे हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघात यांसारख्या हृदयाशी संबंधित गंभीर आजारांचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करणे खूप महत्त्वाचे ठरते. कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी अनेक लोक औषधांचा अवलंब करतात. तथापि, शरीरातील वाढणारे कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी काही घरगुती उपाय देखील प्रभावी ठरू शकतात. घरगुती उपाय आहेत ज्यामुळे खराब कोलेस्ट्रॉलची पातळी मोठ्या प्रम ाणात कमी होऊ शकते.



या मिश्रणाने कोलेस्ट्रॉल होईल कमी

उच्च कोलेस्ट्रॉलच्या समस्येमध्ये आवळा आणि मधाचे सेवन खूप फायदेशीर ठरू शकते. आवळा आणि मधामध्ये असलेले औषधी गुणधर्म अनेक आजार बरे करण्यास मदत करतात. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, फायबर, कॅल्शियम, लोह, अल्कलॉइड्स, फ्लेव्होनॉइड्स आणि अँटीऑक्सिडंट्स सारखे पोषक घटक असतात. एनसीबीआयमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी आवळा खूप फायदेशीर ठरू शकतो. हे शिरामध्ये जमा झालेली चरबी आणि खराब कोलेस्टेरॉल वितळण्यास आणि शरीरातून काढून टाकण्यास मदत करते. याशिवाय, धमनीच्या भिंती निरोगी ठेवण्यास देखील मदत करते. त्याच वेळी, मधामध्ये असे काही पोषक घटक आढळतात जे खराब कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइड्सची पातळी कमी करण्यास मदत करतात. आवळा आणि मधाचे नियमित सेवन केल्यास उच्च कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

सेवन कसे करावे?

उच्च कोलेस्ट्रॉलच्या सम स्येपासून कायमची मुक्तता मि ळवण्यासाठी तुम्ही एक चमचा आवळा पावडर एक चमचा मधात मिसळून खाऊ शकता. या मि श्रणाचे दररोज सकाळी रिकाम्या पोटी सेवन केल्यास शरीरातील वाढलेले वाईट कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. याशिवाय आरोग्याला इतरही अनेक फायदे मिळू शकतात.

शरीरातील वाढलेले कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यासाठी आवळा आणि म धाचे सेवन फायदेशीर ठरू शकते. तथापि, जर तुम्हाला कोणत्याही गंभीर आजाराने ग्रासले असेल, तर ते सेवन करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्या.

## आंबवलेले पदार्थ शरीरासाठी ठरतात लाभदायक, ७ फायदे गुणकारी

फर्मेंटेड फुड म्हणजेच आंबवलेले पदार्थ. इडली, डोसा हे पदार्थ तयार करताना सर्वात आधी त्याचे पीठ आंबवले जाते. आंबवलेले पदार्थ आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. आंबवण्याच्या प्रक्रियेत बॅक्टेरिया आणि यीस्टसारखे सूक्ष्मजीव स्टार्च आणि साखर सारख्या कर्बोदकांमधे अल्कोहोल किंवा ऍसिडमध्ये रूपांतरित करतात. त्यामुळं जास्त प्रमाणात आंबवलेल्या पदार्थांची चवदेखील थोडी आंबट होते. आंबवण्याच्या प्रक्रियेत चांगले जीवाणू वाढतात. या जीवाणूंना प्रोबायोटिक असं म्हणतात. आंबवलेल्या पदार्थांचे सात फायदे जाणून घ्या.



आंबवलेले पदार्थ कसे बनवले जातात?

आंबवलेले पदार्थ बनवण्यासाठी काही पदार्थांना काही तासांसाठी रुम टेम्परेचरवर ठेवून दिले जाते. म्हणजेच जर तुम्हाला इडली किंवा डोसा बनवायचा असेल तर डाळ–तांदुळ मिक्सरमध्ये वाटून त्याचे पीठ तयार करुन ते आंबवण्यासाठी ठेवावे. अशाच प्रकारे तुम्ही ढोकण्याचे पीठदेखील तयार करु शकता. काही तास हे पीठ रुम टेम्परेचरवर ठेवल्याने त्याची आंबण्याची प्रक्रिया सुरु व्हायला लागते. पीठ आंबल्याने त्याची चवदेखील बदलते. तर, पीठ आंबत असताना ते हळूहळू फुलायला लागते. पीठ लवकर आंबवायचे असल्यास बेकिंग सोडा, यीस्ट किंवा फ्रूट सॉल्ट टाकू शकतात.

आंबवलेल्या पदार्थांचे आरोग्यासाठी फायदे

१. प्रोबायोटिक

बहुतेक आंबवलेल्या पदार्थाम ध्ये चांगले जीवाणून असतात. जे प्रोबायोटिक असतात. हे जीवाणू तुम च्या आतड्यातील बॅक्टेरियाचे संतुलन पुनर्संचयित करण्यास मदत करतात आणि पचनासंबंधीत सर्व समस्या दूर करतात.

२. पचनास मदत करतात

नैसर्गिक साखर आणि स्टार्चचे विघटन झाल्यामुळं आंबवलेले पदार्थ पचायला सोपे असतात.

३. जेव्हा आपण काही पदार्थ आंबवतो तेव्हा आपण त्यांची आरोग्य क्षमता वाढवण्यास मदत करत असतो. तुमच्या आतड्यातील बॅक्टिरीया वाढवून शरीराला बी जीवनसत्व आणि व्हिटॅमिन के तयार करण्यची क्षमता निर्माण करते.

४. मूड सुधारतो

आंबवलेल्या पदार्थामध्ये डरलींलरलळश्रश्रळी हशश्रींशींळलीं रपव इळषळवेलरलींशीळर श्रेपर्सी हे दोन गुणधर्म आढळतात. या मुळं मानसिक ताण–तणाव आणि डिप्रेशनसारख्या समस्येंवर मात करण्यास मदत करतात.

५. हृदयाचे आरोग्य सुधारते

आंबवलेले पदार्थ हे पौष्टिक आणि संतुलित आहार आहे. या आहारामुळे हृदयविकाराच्या झटका येण्याची शक्यता कमी होते. तसंच, कोलेस्ट्रॉल बॅलेन्स आणि रक्तदाब नियंत्रणात राहतो.

६. रोगप्रतिकार शक्ती वाढवते

आंबवलेल्या पदार्थांमुळं रोगप्रतिकार शक्ती वाढते. त्यामुळं सर्दी, खोकला यासारखे आजार कमी होतात. व्हिटॅमिन सी, आयर्न, झिंक इत्यादी गुणधर्म आढळतात.

७. वजन कमी करते

अनेक संधोशनानुसार, आंबवलेल्या पदार्थांमुळं वजन व पोटाचा घेर कमी होण्यास मदत होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### नववर्षाच्या सुरुवातीला लागू होणार TRAIचे 'हे' नवे नियम!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाकडून सातत्याने नवे अपडेट्स जारी होत असतात. अशातच आता पुन्हा टीआरएआयचे नवे नियम लागू होणार आहेत. देशभरातील दूरसंचार सेवांच्या सुधारणा करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने नवीन दूरसंचार नियम लागू करण्याचे आदेश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या वेगवेगळ्या राज्यामध्ये परवानगीसाठी वेगवेगळे नियम आणि शुल्क आहेत, ज्यामुळे कंपन्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र आता म ोबाईल नेटवर्कसाठी लागणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीसाठी 'राईट ऑफ वे'हा नवीन नियम लागू करण्यात येणार आहे. यामुळे देशभरातील सर्व दूरसंचार कंपन्यांना एकसमान शुल्क आकारण्यात येणार आहे.

दरम्यान, हे नियम जिओ, एअरटेल, बीएसएनएल आणि व्होडाफोन-आयडिया या कंपन्यांसाठी लागू होणार असून नववर्षापासून टीआरएआयची नवी नियमावली जारी होणार आहे.

काय फायदा होणार?

राईट ऑफ वे नियमानुसार, परवानगी मिळवण्याची प्रक्रिया डिजिटल पद्धतीने होणार आहे. यामुळे राज्य सरकारांकडून दिल्या जाणाऱ्या परवानग्यांमध्ये पारदर्शकता येणार असून प्रक्रिया जलद व सोपी होईल. तसेच ५उ टॉवर्सच्या उभारणीला गती मिळणार आहे.

मोबाईल वापरकर्त्यांना काय लाभ होईल ?

वेगवान नेटवर्क : ५उ सेवेचा विस्तार जलद होईल.

उत्तम कनेक्टिव्हिटी: देशभरात नेटवर्कची गुणवत्ता सुधारेल.

पारदर्शक सेवा: डिजिटल परवानगी प्रक्रियेमुळे ग्रहिकांना अखंड सेवा मिळेल.

### मावळ पॅटर्न उद्ध्वस्त करणारे सुनील शेळके कसे जिंकले, मोदींसोबतच्या भेटीचा किस्सा दादांनी सांगितला, तटकरेंनी गालगुच्चा घेतला

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील सर्वाधिक लक्षवेधी लढत ठरलेल्या मावळ मतदारसंघात अजित पवार गटाच्या सुनील शेळके यांनी बाजी मारली. या मतदारसंघातून सुनील शेळके यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजपने प्रचंड विरोध केला होता. मावळमध्ये यंदा सुनील शेळके यांना पाडण्यासाठी सर्वपक्षीय एकत्र आले होते. राज्यात या मावळ पॅटर्नची चांगलीच चर्चा रंगली होती. मात्र, सुनील शेळके या सर्व विरोधकांचे आव्हान मोडीत काढत विजयी होऊ दाखवले. सुनील शेळके मावळमधून थोड्याथोडक्या नव्हे तर एक लाखांपेक्षा जास्त मताधिक्य घेऊन निवडून आले आहेत. यानंतर सुनील शेळके यांनी अजित पवार यांची भेट घेतली. त्यावेळी अजित पवार यांनी सुनील शेळके आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फोटोचा एक किस्सा उपस्थितांना सांगितला.

अजित पवार यांनी सांगितले की, याची तर ओळख मी डायरेक्ट... आमच्यावेळी मोदींच्या सभेवेळी हा बाहेर थांबला. आमच्या इथे सगळे आमदार आत, शेवटी याला कोणी आतच घेईना. शेवटी मोदीसाहेब शेजारी बसल्यावर सांगितलं, माझा एक आमदार बाहेर थांबलाय, त्याला ताबडतोब आत घ्यायचा आहे. त्यांनी मागच्या सिक्युरिटीला सांगितलं, अजित पवार कोणाला बोलतात, त्याला आत घ्या. मग आत घेऊन सुनील शेळकेंची सेप्रेट ओळख करुन दिली, तोच फोटो त्याने सगळीकडे चालवला. कारण भाजप टोटली विरोधात. सुनील मला आधी म्हणायचा माझी सीट गेली. पण मतदानाच्या दिवशी म्हणाला माझी सीट एक लाखांनी निवडून येणार. माझ्यापेक्षा जास्त मताधिक्याने सुनील शेळके निवडून आला, असे अजित पवार यांनी म्हटले

### पुष्पा २ मध्ये अल्लू अर्जुनसोबत Kissik हा आयटम नंबर करणारी कोण आहे श्रीलीला? जिची झाली श्रद्धा कपूरच्या जागी एंट्री!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पुष्पा २ ची रिलीज डेट जवळ येत आहे. त्याचबरोबर याच्याशी संबंधित अनेक गोष्टींचा उलगडा होत आहे. पुष्पाराज प्रमाणे आता ती फक्त राष्ट्रीय नाही, तर आंतरराष्ट्रीय होणार आहे. पुष्पाप्रमाणेच यातही आयटम नंबर असेल. यापूर्वी सामंथा रुथ प्रभूचे नाव यासाठी चर्चेत होते, मात्र ती या चित्रपटात कोणतेही गाणे करत नाहीये. त्यानंतर तृप्ती डिमरीचेही नाव चर्चेत राहिले. तिला निर्मात्यांनीच नाकारल्याचे सांगण्यात आले.

यानंतर श्रद्धा कपूरच्या नावाची चर्चा सुरू झाली. पण तिच्यासोबतही काम झाले नाहीत. श्रध्दा व्यस्त असल्याचे सांगण्यात आले. पण तिने जास्त पैसे मागितल्याचे खरे कारण दिले. या कारणास्तव तिला हे गाणे मिळाले नाही किंवा तिने स्वतःच नकार दिला. अन्यथा, तिच्यासाठी बातमी आली होती की गाण्याच्या शूटची तारीख निश्र्चित झाली आहे.

बॉलीवूडच्या दोन अभिनेत्री ऑनबोर्ड होऊ शकल्या नाहीत, तेव्हा पुष्पा २ च्या टीमने शेवटी साऊथ अभिनेत्रीवर विश्र्वास ठेवला. या अभिनेत्रीचे नाव आहे श्रीलीला. ही कोणत्याही स्त्रोतांकडून मिळालेली माहिती नाही, निर्मात्यांनी स्वतः तिचे नाव आधीच जाहीर केले आहे. आयटम नंबरचा टीझरही रिलीज झाला आहे. त्याला किसिक गाणे म्हटले जात आहे. गणेश आचार्य यांनी नृत्यदिग्दर्शन केले आहे. चित्रपटाच्या ट्रेलरनंतर हे गाणे रिलीज होणार होते. ट्रेलर १७ नोव्हेंबर रोजी आला आहे. त्यामुळे २४ नोव्हेंबरला आयटम साँग येणार आहे. बरे, गाणे आले की आपण सगळे बघू. पण त्याआधी श्रद्धा कपूरला मागे टाकणारी अभिनेत्री श्रीलीला कोण आहे? ते पाहूया.

# सीएम एकनाथ शिंदे यांनी चॅलेंज देऊनही पराभूत!

## व्हाया सुरत गुवाहाटीला गेलेल्या पाच आमदारांना पराभवाचा दणका, ते पाच आमदार कोण?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या दोन वर्षात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना अनेक धक्के दिले. आता विधानसभा निवडणुकीतही शिंदे यांचे शिवसेनेचे ५७ आमदार निवडून आले आहेत. लोकसभा निवडणुकीत पक्षाची कामगिरी म्हणावी तशी झाली नव्हती. त्यानंतर आता पाच महिन्यांनी शिवसेनेने पुनरागमन केले. कोपरी-पाचपाखरी मतदारसंघातून एकनाथ शिंदे स्वत: मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. कोपरी-पाचपाखरी मतदारसंघात उद्धव ठाकरे गटाचे नेते केदार दिघे यांच्याशी एकनाथ शिंदे यांची थेट लढत होती. एकनाथ शिंदे यांना १५९०६० मते मिळाली आणि त्यांनी केदार प्रकाश दिघे यांचा १२०७१७ मतांनी पराभव केला. दिघे यांना केवळ ३८३४३ मते मिळवता आली. कोपरी जागेवरील उर्वरित सात उमेदवारांना -ध्ऊअ पेक्षा कमी मते मिळाली आणि त्या सर्वांची अनामत रक्कम जप्त झाली. येथे -ध्ऊअ च्या बाजूने २६७६ मते पडली.

गुवाहाटीला गेलेल्या पाच आम दारांचा पराभव

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्यासोबत गुवाहाटीला गेलेल्या पाच आमदारांना पराभवाचा झटका बसला आहे. शिंदे यांनी २०२२ मध्ये गुवाहाटीला गेलेल्या सर्वांना निवडून आणले नाही, तर राजकारणातून निवृत्ती घेऊ असे म्हटले होते. शिदे यांच्या शिवसेनेची विधानसभा निवडणुकीत दम दार कामगिरी झाली असली, तरी पाच आमदारांना मात्र पराभव स्वीकारावा लागला आहे. यामध्ये सदा सरवणकर, यामिनी जाधव, शहाजीबापू पाटील, संजय रायमूलकर आणि ज्ञानराच चौगुले यांचा समावेश आहे. माहीममध्ये सदा सरवणकर यांचा तिरंगी लढतीत पराभव झाला. शहाजीबापू पाटील यांना सांगोल्यात शेकापकडून पराभव स्वीकारावा लागला. भायखळ्यातून यामिनी जाधव पराभूत झाल्या. बुलढाण्यातून संजय रायमूलकर यांचा पराभव झाला. उमरग्यामध्ये ज्ञानराज चौगुले यांचा पराभव झाला.

महायुतीमधील विजयाची तीन कारणे

१. 'माझी लाडकी बहिण' योजनेम ुळे महायुतीला महिलांची मते मिळाली

महायुतीच्या शिंदे सरकारने जून २०२४ मध्ये 'माझी लाडकी बहिण' योजना सुरू केली. या योजनेंतर्गत वार्षिक २.५ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत २.३४ कोटी महिलांना याचा लाभ मिळाला, जे राज्यातील एकूण महिला मतदारांपैकी जवळपास निम्मे आहे. निवडणुकीच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'महायुतीची सत्ता आल्यास योजनेंतर्गत दरमहा २१०० रुपये दिले जातील', असे आश्वासन दिले होते. अनेकांनी त्याचे कौतुक केले.



२. संघ मैदानात उतरला, सभा घेतल्या आणि भाजपसाठी मते मागितली

लोकसभा निवडणुकीच्या काळात भाजप आणि संघाचे संबंध बिघडत असल्याच्या अनेक बातम्या येत होत्या. निकालात भाजप २४० जागांवर घसरला. या निकालाचा संबंध आरएसएस आणि भाजपमधील बिघडत चाललेल्या संबंधांशी असल्याचे दिसून आले. यानंतर हरियाणाच्या निवडणुकीत संघाने मजल मारली आणि भाजपने ४८ जागा जिंकून हॅटट्रिक केली. महाराष्ट्रातही भाजपची मते मागण्यासाठी संघ मैदानात उतरला.

लोकांना पटवून देण्यात महाविकास आघाडी मागे पडली

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने संविधान, अदानी आणि आरक्षण हे मुद्दे केले होते. लोकसभा निवडणुकीत भाजप २४० पर्यंत घसरला आणि काँग्रेसने आघाडीसह ९९ जागा जिंकल्या, परंतु महाराष्ट्रात हे मुद्दे फेल ठरले आहेत.

## जरांगे, लाडकी बहीण, कटेंगे-बटेंगे नाही तर 'या' फॅक्टरमुळे हारलो; राऊतांनी स्पष्टच सांगितलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**महाविकास आघाडीचा विधासभा निवडणुकीमध्ये दारुण पराभव झाला आहे. या पराभवानंतर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी पहिली प्रतिक्रिया नोंदवली आहे. ''जी जनता कोरोनाकाळात कुटुंबप्रमुख माझं ऐकत होती ती माझ्याशी विश्वासघात करेल असं वाटत नाही,'' असं ठाकरेंनी म्हटलं आहे. दुसरीकडे अद्याप शरद पवारांच्या राष्ट्रवादीने निकालावर थेट प्रतिक्रिया नोंदवलेली नाही. अशातच आता ठाकरेंच्या शिवसेनेच प्रवक्ते संजय राऊतांनी महाविकास आघाडीच्या पराभवावर विचारमंथन सुरु असल्याचं सांगतानाच नेमका पराभवासाठी कोणता फॅक्टर कारणीभूत ठरला याबद्दल भाष्य केलं आहे.

अनेक मुद्दे गाजले

महाविकास आघाडी विरुद्ध महायुती या राजकीय संघर्षामध्ये मागील एक ते दीड म हिन्यापासून अनेक मुद्दे चर्चेत राहिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची दुर्घटना, मराठा आरक्षणाचा मुद्दा, महिला सुरक्षेचा मुद्दा, संविधान, लाडकी बहीण योजना, बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है यासारख्या घोषणांपासून अगदी गद्दारीचा मुद्दाही चर्चेत आला. जरांगे फॅक्टरचा फटका सत्ताधाऱ्यांना बसेल अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र असं काहीही झालं नाही आणि राज्यामद्ये २८८ पैकी २३० जागांवर महायुतीच्या उमेदवारांनी बाजी मारली. तर म हाविकास आघाडीला ५० चा आकडाही गाठता आला नाही. महाविकास आघाडीला केवळ ४६ जागांवर समाधान मानावलं लागलं आहे. तर १२ अपक्ष उमेदवार आमदार झालेत. या साऱ्या गोष्टींसाठी कोणता फॅक्टर कारणीभूत ठरला याबद्दल राऊतांनी प्रसारमाध्यांशी बोलताना भाष्य केलं.



''या निवडणुकीमध्ये मतविभागणी हा सगळ्यात मोठा फॅक्टर आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक मतदारसंघात मतविभागणीसाठी त्यांनी अडथळे निर्माण केले. स्वत:पेक्षा मतविभागणीवर जास्त लक्ष दिलं आणि त्याचा फटका आम्हाला बसला. मनसे, वंचितचं मॅनेजमेंट करुन आमचे उमेदवार पाडण्यात आले. हे चित्र तुम्ही मुंबईसहीत महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बघू शकता,'' असं राऊत म्हणाले. तसेच पुढे बोलताना, ''एकनाथ शिंदेंनी, अजित पवारांनी काय तीर मारला आहे की त्यांना इतक्या जागा मिळाव्यात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची यामध्ये महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

## एलॉन मस्क यांचा ईव्हीएमवरून 'यू टर्न'? भारतीय निवडणूक प्रक्रियेचं केलं कौतुक

वॉशिंग्टननवी दिल्ली: अमेरिकेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीपूर्वी मतदान यंत्र (ईव्हीएम मशिन) सुरक्षित नाहीत, असा दावा करून खळबळ उडवून देणाऱ्या टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांनी यू टर्न घेतला. त्यांनी कॅलिफॉर्नियातील मतपत्रिकेच्या मतमोजणीवरून नाराजी व्यक्त केली. भारतामधील दोन राज्यांसह विविध पोटनिवडणुकीतील मतमोजणी वेगानं करणाऱ्या भारतीय निवडणूक यंत्रणेचं मस्क यांनी कौतुक केलं. संगणकीय प्रोग्राम हॅक करता येऊ शकतात, असा दावा करत ईव्हीएमच्या वापराबाबत एक्स मीडियाचे मालक एलॉन मस्क यांनी संशय करणारे वक्तव्य केलं होतं. हे वक्तव्य भारतात लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान केल्यानं काँग्रेसह इतर विरोधकांनी ईव्हीएमबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. महाराष्ट्रात म हाविकास आघाडीचा दारुण पराभव झाल्यानंतर एलॉन मस्क यांनी भारतीय निवडणूक प्रक्रियेचं कौतुक करणारी पोस्ट केल्यानं ते चर्चेचा विषय ठरत आहेत.

भारतामधील निवडणुकीत ६४० दशलक्ष मतांची मोजणी एका दिवसात करण्यात आली, ही माहिती देणारी पोस्ट टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांनी एक्स मीडीयावर शेअर केली. या पोस्टमध्ये त्यांनी भारतामधील निवडणूक यंत्रणेचं कौतुक केलं आहे. ''भारतामध्ये दोन राज्यांसह पोटनिवडणुकांचे निकाल एका दिवसात लागतात. मात्र, कॅलिफॉर्नियामध्ये अजूनही मतमोजणी सुरू आहे,'' अशी पोस्ट करत त्यांनी कॅलिफॉर्नियातील निवडणूक यंत्रणेवर टीका केली. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी झाले आहेत. त्यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. मात्र, कॅलिफॉर्नियामध्ये दोन आठवडे उलटूनही ३ लाख मतपत्रिकांची मोजणी पूर्ण झालेली नाही. कॅलिफॉर्नियात कशामुळे मतम ोजणीला होतोय उशीर ३९ दशलक्ष लोकसंख्या असलेले कॅलिफॉर्निया हे अमेरिकेतील सर्वाधिक लोकसंख्येचं शहर आहे. ५ नोव्हेंबर रोजी झालेली निवडणुकीत १६ दशलक्ष नागरिकांनी मतदान केले. निवडणुकीत मतमोजणी आणि पडताळणीची प्रक्रिया अत्यंत संथगतीनं सुरू आहे. कॅलिफॉर्नियाचा विस्तार आणि पोस्टानं होणारं मतदान यामुळे मतमोजणीला उशीर लागत आहे. स्थानिक निवडणूक अधिकाऱ्याच्या माहितीनुसार मतमोजणीसाठी दोन आठवड्यांहून अधिक जास्त वेळ लागतो. पत्रामधून येणाऱ्या प्रत्येक मताची पडताळणी आणि सत्यता पाहण्याची किचकट प्रक्रिया असते.

## ''तू आमदार कसा होतो तेच बघतो'' ; अजित पवारांनी खुल आव्हान दिलेला पुण्यातला तो नेता हारला की जिंकला?

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात सुरू असलेली विधानसभा निवडणुकीची धामधूम काल अखेर कमी झाली. आता सत्ता स्थापनेकडे आणि मुख्यमंत्रीपदाकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. राज्यात महायुतीने मोठ्या प्रमाणावर यश मिळवलं, तर महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. या दरम्यान असे काही म हत्त्वाचे मतदासंघ होते त्याकडे लक्ष वेधलं गेलं होतं. दरम्यान लोकसभा निवडणुकीचा वचपा महायुतीने विधानसभेला काढल्याच्या चर्चा सुरू आहेत. अशातच लोकसभा निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी शरद पवारांच्या पक्षातील एका बड्या नेत्याला तू आमदार कसा होते ते मी पाहतो, असं आव्हान दिलं होतं. त्या आमदारांचं निवडणुकीत काय झालं यावर आता चर्चा सुरू झाल्या आहेत.

कोण आहे तो नेता?

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी लोकसभा निवडणुकीच्या वेळी शिरुरचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांच्या पक्षाचे नेते अशोक पवार यांना भरसभेत खुलं आव्हान दिलं होतं. त्यांना तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? अशा शब्दात खुलं आव्हान दिलं होतं. या विधानसभा निवडणुकीवेळी शरद पवारांनी अशोक पवार यांना शिरुरम धून उमेदवारी दिली होती. तर त्यांच्या विरोधात अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ज्ञानेश्वर कटके यांना निवडणुकीच्या रिंगणात उभं केलं होतं.

शिरूर मतदारसंघातून अजित पवारांच्या उमेदवाराने दणदणीत विजय मिळवला आहे, ज्ञानेश्वर कटके यांना १९२२८१ इतकी मतं मिळाली आहेत. तर अशोक पवारांना ११७७३१ इतकी मते मिळाली आहे. ७४५५० मतांच्या फरकाने अजित पवारांचा उमेदवार निवडून आला आहे. त्यामुळे अजित पवारांनी दिलेलं आव्हान पूर्ण केल्याच्या चर्चा अजित पवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि पदाधिकाऱ्यांनी सुरू आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरु होती. या पार्श्र्वभूमीवर अजित पवार यांची शिरूर लोकसभा मतदारसंघात जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना अजित पवार यांनी शरद पवार गटाचे शिरूरचे आमदार अशोक पवार यांना खुलं आव्हान दिलं होतं. ''आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय?'',असं अजित पवारांनी आव्हान दिलं होतं.

''दिलीप वळसेंचा शपथविधी झाला आणि यांची (अशोक पवार यांची) सटकली. ते म्हणाले, दादांनी दिलीप वळसे पाटलांना मंत्रिमंडळात घ्यायला नको होतं. दादा एकटे जिल्ह्यातून गेले असते तरी आमची कामं झाली असती. त्यांच्या डाव्या आणि उजव्या हाताला कोण आम दार बसले होते. त्यांच्या कानात यांनी (अशोक पवार यांनी) असं सांगितलं.''

''आता अशोक पवार काय म्हणत होते ते मला त्या आमदारानं सांगितलं. त्यानंतर ते (अशोक पवार) तिकडे (शरद पवार गटात) गेले. त्यांना पवार साहेबांनी सांगितलं की, पुढच्या वेळेस तुच मंत्री. आता पुढच्या वेळेस मंत्री होण्याकरता त्यांनी कारखान्याची वाट लावली आणि मंत्री व्हायला निघाले. आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? अजित पवारांनी एकदा मनावर घेतलं तर मी आमदार होऊ देत नाही. आता मी पण चॅलेंज देतो तु आमदारच कसा होतो ते बघतो. मी लोकांना सांगेन की यांची खरी औकात काय आहे'', असं आव्हान लोकसभेच्यावेळी भर सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार गटाचे शिरूरचे आम दार अशोक पवार यांना दिलं होतं.

# मुंबई-बेंगळुरू बायपास हायवेवरील वारजे ओव्हर ब्रिजवर टँकर पलटी; वाहतूक ठप्प

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** मुंबई-बेंगळुरू बायपास हायवेवरील वारजे ओव्हर ब्रिजवर आज सकाळी भारत पेट्रोलियम समोर इंडियन ऑइलचा एक पेट्रोल टँकर पलटी झाल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. सुदैवाने टँकर रिकामा असल्याने आग लागण्याचा धोका टळला आहे.

अपघातात टँकर रस्त्यात पूर्णपणे आडवा पडला, त्याचा मागील भाग रस्त्यावर अडथळा निर्माण करत होता, तर ड्रायव्हर केबिनसह पुढचा भाग पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या ट्रॅकवर घुसला आणि पलीकडच्या बाजूला धडकला. सुदैवाने समोरच्या बाजूने येणारे कोणतेही वाहन त्यावेळी





नसल्याने मोठी दुर्घटना टळली. पलीकडच्या ट्रॅकवरही कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

अपघातानंतर साताऱ्याकडे जाणारी सर्व वाहतूक बंद करण्यात आली असून, सध्या वाहने सर्विस रोडवर वळवण्यात आली आहेत. यामुळे सेवासुविधा रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वाहतूक पोलिसांना घटनास्थळी तैनात केले असून, टँकर हटवण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, या अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. प्रथमिक माहितीनुसार, टँकरच्या वेगावर नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात घडला असावा, असा अंदाज आहे. वाहनचालकाच्या प्रकृतीबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही.

# मेहकरात आज भव्य मोफत रोगनिदान व रक्तदान शिबीर

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार उद्घाटन

## मुंबईतील जेजे हॉस्पीटलचे तज्ञ डॉक्टर एक दिवस मेहकरात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मेहकर येथे आज दि. २५ नोव्हेंबर रोजी भव्य मोफत रोगनिदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

हे शिबीर मेहकर शहरातील कॅाटन मार्केट येथील राजश्री आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय येथे सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत राहणार आहे. या शिबिरात मुंबई येथील सर जे.जे. हॉस्पिटलमधील तज्ञ डॉक्टर एक दिवसासाठी मेहकरवासीयांच्या सेवेत उपस्थित राहणार आहेत.

या शिबिराला माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर, जिल्हाधिकारी किरण पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भूसारी, मेहकर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राम टापरे हे प्रमुख पाहुणे तर बळीराम मापारी, सुरेश विश्र्वनाथ बाळूकर, जयचंद बाठीया, वैशाली सावजी, महाराष्ट्र अर्बनचे कार्यकारी संचालक अजय उमाळकर आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहेत.

मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलचे अस्थिव्यंगोपचार तज्ञ डॉ. आदित्य अग्रवाल, डॉ. विजय कुमावत, प्लास्टिक सर्जन डॉ. नितीन जगताप, डॉ. मोहित सिंग राजपूत, बालरोग शल्यचिकित्सक डॉ.ए.आर. रेड्डी, डॉ. अविनाश जाधव, डॉ. नरेश, औषधवैद्यकशास्त्र डॉ. ऋषिकेश चिलोरे, डॉ. गुणवंत, कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. अनुजा गायकवाड, कौशिक पेडामकर, त्वचा व गुप्तरोग तज्ञ डॉ. विशांत बनसोड, डॉ. कुणाल गोयल, मनोविकृती तज्ञ डॉ. रोशन फिलीप्स, डॉ. शादाब, जनरल सर्जन डॉ. शुभम मोरे, डॉ.प्रतिक मस्के, नेत्रशल्य चिकित्सक डॉ. मोहनेश नायक, डॉ. हिमांशू गुरलवार, डॉ. यश चव्हाण, न्यूरो सर्जन डॉ. हर्षिल बागडिया, डॉ. कार्थिक गौड, मुत्रपिंड तज्ज्ञ डॉ. श्र्वेता सिंग, डॉ. मनु सब्बु, जनऔषधवैद्यकशास्त्र डॉ. शिवप्रसाद, डॉ. शाहरुख, बालरोग शल्यचिकित्सक डॉ. महेंद्र डांगे, समाजसेवक प्रार्थना, सुनिल पाटील, प्रेमसिंग राठोड हे उपस्थित राहणार आहेत.



याशिबिरात अस्थीरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, कान-नाक-घसा तज्ञ, हृदय रोग तज्ञ, मुत्रपिंड व मुत्रमार्ग विकारतज्ञ, मेंदू व मज्जासंस्था विकार तज्ञ, जठर व पोटाचे विकार तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, त्वचारोग तज्ञ, कर्करोग तज्ञ आणि मानसिक आजार तज्ञ या विशेषज्ञांची सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच इतर सर्व दूर्धर आजारांची तपासणी करण्यात येणार असून या दुर्धर आजारांवर रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येईल. या भव्य मोफत रोगनिदान व रक्तदान शिबिराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे व तज्ञ डॉक्टरांच्या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केले आहे.

## ‘महायुती २.0’ सरकारमध्ये कोणत्या पक्षाला किती मंत्रिपदं? तिघांचा फॉर्म्युला ठरला?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुतीने ऐतिहासिक कामगिरी करत विधानसभेच्या निवडणुकीमध्ये यश संपादन केल्यानंतर सत्तास्थापनेसाठी हलचाली सुरु झाल्या आहेत. एकनाथ शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीच्या विजयी आमदारांना विजयाचं सर्टिफिकेट घेऊन मुंबईत बोलवण्यात आलं आहे. अजित पवारांच्या पक्षातील नवनिर्विचित आमदारांची 'सागर' बंगल्यावर बैठक झाली असून त्यांनी गटनेता म्हणून अजित पवारांची निवड केली आहे. अजित पवारांच्या पक्षाने ४१ जागांवर विजय मिळवला आहे. तर भारतीय जनता पार्टीने १३२ जागा जिंकल्या असून शिंदेंच्या शिवसेनेनं ५७ जागांवर बाजी मारली आहे. महायुतीने २८८ पैकी २३० जागांवर विजय मिळवला आहे. या विजयानंतर आता सत्तेमध्ये प्रत्येक घटक पक्षाला सत्तेत कसा वाटा मिळणार यासंदर्भातील फॉर्म्युल्यावर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. नेमका हा फॉर्म्युला कसा असेल ते पाहूयात...

असं होणार मंत्रिपदांचं वाटप

समोर आलेल्या माहितीनुसार, जितके आमदार निवडून आले आहेत त्यांच्या संख्येनुसार मंत्रिपदांचं वाटपं केलं जाईल अशी दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. महायुतीमधील घटकपक्षांच्या मंत्रिपदाच्या फॉर्म्युलानुसार दर सहा ते सात आमदारांच्या मागे एक मंत्रिपद दिलं जाणार आहे. याच समिकरणानुसार १३२ जागा जिंकणाऱ्या भारतीय जनता पार्टीला सर्वाधिक मंत्रिपदं मिळणार आहेत. तर त्या खालोखाल शिंदेंच्या शिवसेनेला सत्तेतील सर्वात मोठा वाटा मंत्रिपदाच्या रुपाने मिळेल. महायुतीमधील सर्वात कमी जागा जिंकणाऱ्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या वाट्याला त्याचप्रमाणामध्ये मंत्रिपदं दिली जाणार आहे. प्रत्येक सहा ते सात आमदारांमागे एक मंत्रिपद असा विचार केल्यास १३२ जागा जिंकणाऱ्या भाजपाला नव्या सरकारमध्ये २२ ते २४ मंत्रिपदं मिळतील. ५७ जागा जिंकणाऱ्या शिंदेंच्या पक्षाला १० ते १२ मंत्रिपदं मिळू शकतात. त्याचप्रमाणे ४१ जागा मिळवणाऱ्या अजित पवारांच्या पक्षाला एकूण ८ ते १० मंत्रिपदं मिळतील असा अंदाज आहे. सध्या मुख्यमंत्री कोण होणार याबद्दल केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा होणं बाकी आहे. असं असतानाच या तिन्ही नेत्यांच्या संमतीने मंत्रिपदाचा फॉर्म्युला निश्चित करुन तो वरिष्ठांना कळवला जाणार आहे.

## महायुती सरकारच्या शपथविधीपूर्वी शिवतीर्थवर अचानक हालचालींना वेग, राज ठाकरेंनी बोलावली तातडीची बैठक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आता मुंबईत सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. महायुती सरकारचा शपथविधी २५ नोव्हेंबरला वानखेडे स्टेडिअम किंवा राजभवनात शपथविधी होण्याची शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर शिंदे गट, अजितदादा गट आणि भाजपचे आमदार मुंबईत दाखल व्हायला सुरुवात झाली आहे. या सगळ्या हालचाली सुरु असताना मनसेप्रमुख राज ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या शिवतीर्थवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. विधानसभा निवडणुकीत मनसेने राज्यातील १२८ विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे केले होते. मात्र, मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नव्हता. मनसेचे एकमेव आमदार असलेल्या राजू पाटील यांचाही पराभव झाला होता. तर राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांचाही माहीम विधानसभा मतदारसंघात दारुण पराभव झाला होता. या पराभवाच्या पार्श्र्वभूमीवर सोमवारी मुंबईत मनसेची बैठक बोलावण्यात आली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बैठक बोलावली आहे. उद्या सकाळी राज ठाकरे यांच्या दादर येथील शिवतीर्थ या निवासस्थानी बैठक बोलावली आहे. मनसेचे प्रमुख नेते या बैठकीसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या बैठकीत राज ठाकरे काय बोलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज ठाकरे आणि महायुतीमध्ये जवळीक वाढली होती. त्यामुळे महायुतीची सत्ता आल्यावर राज ठाकरे यांच्या मनसेला सत्तेत वाटा मिळेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, आता भाजपला एकहाती १३२ जागांवर विजय मिळाला आहे. त्यामुळे भाजपला सत्तास्थापनेसाठी मनसेसारख्या घटकपक्षांची गरज उरलेली नाही. परंतु, आता राज ठाकरे यांनी दिलेल्या बिनशर्त पाठिंब्याची जाण ठेवून महायुती मनसेला सत्तेचा लाभ देण्यासाठी काही पावले उचलणार का, हे बघावे लागेल. त्यामुळे शिवतीर्थवरील मनसेची सोमवारची बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

महायुतीच्या मंत्रिपदाचा शपथविधी सोमवारी होण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, उद्या राजभवनात किंवा वानखेडे स्टेडिअमवर मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांचा शपथ सोहळा संपन्न होईल.

## निकालानंतर विधानपरिषदेच्या ६ जागा रिक्त

## नाराजांना खूश करण्याची महायुतीला पुन्हा संधी; नेमकी कुणाला संधी मिळणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीच्या निकालात महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. या निवडणूकत भाजपाने तब्बल १३२ जागांवर विजय मिळवला आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला ५७ आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या आहेत. दरम्यान, या निवडणुकीत महायुतीने अनेक दिग्गजांना तिकीट दिले होते. यात विधानपरिषदेवर आमदार असलेल्या काही नेत्यांचाही समावेश आहे. त्यामुळेच आता विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीच्या ६ नेत्यांची विधानपरिषदेवर वर्णी लागणार आहे.

भाजपाच्या एकूण चार जागा रिक्त

मिळालेल्या माहितीनुसार विधानसभेच्या निकालानंतर विधानपरिषदेच्या एकूण सहा जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे आता या निवडणुकीत ज्या नाराज नेत्यांना डावलण्यात आले होते, त्यांना आता विधानपरिषदेवर संधी दिली जाऊ शकते. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत परिषदेतील भाजपच्या ४ आमदारांची विधानसभेवर वर्णी लागली आहे. सध्या विधानपरिषदेवर आमदार असलेल्या चंद्रशेखर बावनकुळे, गोपीचंद पडळकर, रमेश कराड आणि प्रविण दटके हे भाजपाचे चार नेते विधानसभेवर निवडून आले आहेत. त्यामुळे विधानपरिषदेत भाजपच्या ४ जागा रिक्त झाल्या आहेत.

शिंदे, अजित पवार यांच्या प्रत्येकी एक-एक जागा रिक्त

दुसरीकडे शिवसेनेकडून आमश्या पाडवी यांचीही विधानसभेवर निवड झाली आहे. त्यामुळे शिवसेना पक्षाचीही एक जागा विधानपरिषदेत रिक्त होणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत तिकीट न मिळालेल्या नाराज नेत्याला संतुष्ट करण्याची संधी एकनाथ शिंदे यांना मिळणार आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते राजेश विटेकर हेदेखील विधानपरिषदेवर आमदार आहेत. मात्र ते विधानसभा निवडणुकतीही विजयी झाले आहेत. परिणामी विधानपरिषदेची त्यांची जागा रिक्त होणार आहे. त्यामुळे अजित पवार यांनादेखील त्यांच्या एका नेत्याची नाराजी दूर करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे महायुतीचे तिन्ही घटकपक्ष नेमकं कोणाला संधी देणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

कोणत्या पक्षाचा किती जागांवर विजय झाला?

महायुती- २३६

मविआ- ४९

इतर- ३

---------------

भाजपा- १३२

शिवसेना (शिंदे गट)- ५७

राष्ट्रवादी (अजित पवार गट)- ४१

काँग्रेस- १६

राष्ट्रवादी (शरद पवार गट)- १०

शिवसेना (ठाकरे गट)- २०

समाजवादी पार्टी- २

जन सुराज्य शक्ती- २

राष्ट्रीय युवा स्वाभीमान पार्टी- १

राष्ट्रीय समाज पक्ष- रासप- १

एमआयएम- १ जागा

सीपीआय (एम)- १

पिजन्ट्स अँड वर्कर्स पार्टी ऑफ इँडिया- पीडब्ल्यूपीआय- १

राजर्षी शाहू विकास आघाडी- १

अपक्ष- २

## निकाल आश्‍चर्यजनक आहे, असा निकाल अपेक्षित नव्हता- यशोमती ठाकूर

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात असा निकाल लागणे आश्र्चर्यजनक आहे. असा निकाल अपेक्षीत नव्हता, पराभूत झालो असलो तरी हा अंत नाही, आमची लढाई लोकशाही वाचवण्याची सुरूच राहील, अशी प्रतिक्रिया माजी आमदार यशोमती ठाकूर यांनी दिली. महराष्ट्रात आलेल्या निकालावर त्या प्रतक्रिया देताना माध्यमांशी बोलत होत्या. यावेळी पुढे म्हणाल्या की, ज्या-ज्या मतदारांनी महाविकास आघाडीला मतदाम केले. त्यांचे आभार मानते. महाराष्ट्रात निकाल हे आश्र्चर्यजनक आले आहेत, असा निकाल अपेक्षित नाही. पुरोगामी महाराष्ट्रात काय खेळी केली आहे ही समजण्याच्या पलीकडे आहे. विरोधी पक्ष पूर्ण दाबण्याचा प्रयत्न या ठिकाणी झाला आहे आणि हे लोकशाहीच्या विरोधात आहे. ज्या प्रकारे देश चालला आहे, या सगळ्या गोष्टी बारकाईने बघितल्या पाहिजेत, माझा हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र अशा प्रकारचा निकाल नाही देऊ शकत यावर माझा विश्र्वास आहे. असे बोलून त्यांनी निकालावर शंका उपस्थित केली. तर पराभूत झालो असलो तरी हा अंत नाही, आमची लढाई लोकशाही वाचवण्याची आहे. लोकशाहीमध्ये जर काही गडबड कोण करत असेल तर आपण त्याकडे कटाक्षाने पाहिले पाहिजे, असे मतही माजी आमदार यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले.



## सामान्य जनतेच्या रोषामुळे यशोमती ठाकूर यांचा पराभव

### नवनिर्वाचित आमदार राजेश वानखडे यांची यशोमती ठाकूरवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** यशोमती ठाकूर यांनी मतदार संघामध्ये केलेल्या चिखलात कमल फुलले आहे. मतदारसंघामध्ये शेतकऱ्यांच्या दुष्टीने गावातील पांदन रस्ते, नाले, पाणी यावर विशेष काम झालेले नाही, यशोमती ठाकूर यांनी जे आराखडे म्हणून काम केले ते सांगतात, असे कोणतेही आराखडे नाहीत, सर्व सामान्य जनतेचा रोष होता म्हणून यशोमती ठाकूर यांचा पराभव झाला. असे भाष्य भाजपचे नवनिर्वाचीत आमदार राजेश वानखेडे यांनी केले. अमरावती जिल्ह्यातील तिवसा मदतरसंघात गेले १५ वर्ष आमदार असताना यशोमती ठाकूर पाणी पुरवठा करू शकल्या नाहीत, यशोमती ठाकूर यांनी एमआयडीसीमध्ये कोणताही उद्योग आणलेला नाहीत, देवेंद्र फडवणीस यांनी उद्योग आणले आणि यशोमती ठाकूर यांनी फक्त पैसे खाण्याचे काम केले. तरुणांसाठी काही केलेले नाही, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांसाठी एखादे सेंटर सुद्धा उघडले नाही. यशोमती ठाकूर यांनी आराखड्यात बांधलेली एक ही गोष्ट कामाची नाही,अशी टिका भाजपचे नवनिर्वाचित आमदार राजेश



वानखडे यांनी केली.

## विविध वृत्त...

## कडुलिंब आणि हळदीमुळे बरा झाला कॅन्सर, असा सिद्धूचा दावा, काय म्हणाले टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे डॉक्टर?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नवज्योत सिंग सिद्धू यांनी सांगितले की, त्यांची पत्नी आता कॅन्सरमुक्त आहे. कडुलिंब, हळद, लिंबू आणि आवळा यांचा आहारात समावेश करून त्यांच्या पत्नीचा कर्करोग बरा झाला. या घरगुती उपायांनी त्यांच्या पत्नीने कर्करोगावर मात केल्याचा दावा सिद्धूने केला आहे. सिद्धूचे हे वक्तव्य सोशल मीडियावरही चांगलेच व्हायरल होत आहे. यानंतर अनेक कर्करोग रुग्ण त्यांच्या डॉक्टरांना आयुर्वेदाने उपचार सुरू करण्याबाबत विचारत आहेत. दरम्यान, देशातील सर्वात मोठ्या कर्करोग रुग्णालयांपैकी एक असलेल्या टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या २०० हून अधिक कर्करोग डॉक्टरांनी लोकांना आवाहन करणारे पत्र जारी केले आहे.

या पत्रात डॉक्टरांनी म्हटले आहे की, माजी क्रिकेटरचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो आपल्या पत्नीच्या स्तनाच्या कर्करोगावरील उपचाराविषयी सांगत आहे. व्हिडिओच्या काही भागांमध्ये असे म्हटले आहे की डेअरी उत्पादने आणि साखर न खाल्ल्याने आणि हळद आणि कडुलिंबाचे सेवन करून कर्करोगाचा उपचार केल्याने त्याचा कर्करोग बरा झाला.

माजी क्रिकेटपटूच्या या दाव्यांबाबत वैद्यकीय शास्त्रात कोणताही पुरावा नसल्याचे डॉक्टरांनी म्हटले आहे. अशा आयुर्वेदिक उपायांवर संशोधन चालू आहे, परंतु हळद किंवा कडुलिंब कर्करोगविरोधी एजंट म्हणून फायदेशीर असल्याचे सूचित करणारा कोणताही डेटा सध्या उपलब्ध नाही. असे दावे खरे मानू नका, असे आवाहन डॉक्टरांनी केले आहे. त्यांना कर्करोगाची लक्षणे आढळल्यास, डॉक्टर आणि कर्करोग विशेषज्ञांचा सल्ला घ्या. वेळीच निदान झाले, तर कर्करोग बरा होऊ शकतो.

फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशनचे (एफएआयएमए) अध्यक्ष डॉ सुवर्णाकर दत्ता म्हणाले की, कर्करोगाच्या उपचाराबाबत चुकीची माहिती घातक ठरू शकते. कडुनिंब आणि हळद यांसारख्या गोष्टींमध्ये कर्करोगविरोधी घटक असतात की नाही यावर संशोधन सुरू आहे. अशा परिस्थितीत, सोशल मीडियावर केल्या जाणाऱ्या दाव्यांना फसवू नका आणि तुमच्या कर्करोगाच्या उपचारांना उशीर करू नका. अप्रमाणित उपचारांमुळे होणारा विलंब रुग्णाच्या जीवावर बेतू शकतो! लोकांनी सोशल मीडियावर न जाता कॅन्सर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पंकजाताई तुम्ही माझ्यासारख्या प्रामाणिक माणसाला गमावलंत, निवडून येताच भाजपा आमदार सुरेश धस यांची व्यथा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडून येताच आमदार सुरेश धस यांनी भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस व विधान परिषद सदस्या पंकजा मुंडे यांच्यावर टीका केली आहे. ''पंकजा मुंडे यांनी त्यांच्या स्वीय सहाय्यकाला सांगून अपक्ष उमेदवाराला मतदान करायला सांगितलं. त्यांच्या स्वीय सहाय्यकाने मतदारसंघात मला मतं मिळू नये यासाठी काम केलं. पंकजा मुंडेंनी असं करायला नको होतं'', अशा शब्दांत धस यांनी त्यांच्या मनातील खदखद व्यक्त केली. निवडणूक जिंकल्यानंतर सुरेश धश यांनी मतदारसंघात विजयी प्रचारफेरी काढली. त्यानंतर घेतलेल्या सभेला संबोधित करताना त्यांनी पंकजा मुंडे यांच्यावरील नाराजी व्यक्त केली. सुरेश धस यांनी आष्टी मतदारसंघात ७७,९७५ मताधिक्याने विजय मिळवला आहे.

सुरेश धसं यांना आष्टी मतदारसंघात १,४०,५०७ मतं मिळाली आहेत. तर, या मतदारसंघात अपक्ष उमेदवार ६५,५३२ मतं मिळाली आहेत. या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार) उमेदवार महबुब शेख यांना ५२,७३८ व राष्ट्रवादीचे (अजित पवार) उमेदवार बाळासाहेब आजबे यांना २१,५९५ मतं मिळाली आहेत.

दरम्यान, बलाढ्य विजयानंतर सुरेश धस यांनी विजयी प्रचारसभा घेतली. विजयी गुलाल उधळल्यानंतर धस यांनी पंकजा मुंडे यांच्यावरील नराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ''पंकजाताई राजकारणात तुम्ही माझ्यासारख्या प्रमाणिक माणसाला गमावून बसलात. आजपासून तुम्ही मला गमावलंत. तुमचे माझ्याविरोधात फोन यायला नको होते. मी कायम तुमचा मानसन्मान राखला. प्रामाणिकपणे मी तुमच्याबरोबर राहिलो. मी तुमचं काम केलं. मात्र तुंम्ही काय केलंत? तुम्ही मला पाडा म्हणून सांगितलं. तुम्ही तरी असे फोन करायला नको होते. त्यांच्या स्वीय सहाय्यकाने फोन करायला नको होते. संकेत सानप यांनी फोन केले, ते सतत पंकजा मुंडेंबरोबर असतात. मला त्यांना सांगायचं आहे की आम्ही तळहाताच्या फोडाप्रमाणे हा वंजारी समुदाय जपला आहे. ते प्रामाणिकपणे माझ्याबरोबर आहेत.

## निवडणूक जिंकली पण मध्येच खोडा, मोठ्या कायदेपंडीताचं विधानसभेच्या निकालाला आव्हान; विजय कायद्याच्या कचाट्यात?

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला कौल दिला आहे. जनतेने महायुतीच्या पारड्यात मतांचं भरभरून दान दिलं आहे. दरम्यान, आता महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. दुसरीकडे विरोधक मात्र या निकालावर संशय व्यक्त करत आहेत. या निकालात काहीतरी घोळ आहे. ईव्हीएम हॅक करण्यात आली आहे. चुकीच्या पद्धतीने मतमोजणी करण्यात आली, असे वेगवेगळे आरोप विरोधक करत आहेत.